**आकाशवाणी पुणे**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**पुणे वृत्तांत**

**वेळ - संध्याकाळी 06.00 वा.**

**दिनांक- 10.01.2025** **वार- शुक्रवार**

---

**मराठी भाषा विभाग**

राज्य सरकारच्या मराठी भाषा विभागाच्या वतीनं पुण्यात फर्ग्युसन महाविद्यालयात येत्या 31 जानेवारी ते 2 फेब्रुवारी, या कालावधीत विश्व मराठी संमेलन आयोजित करण्यात आलं असल्याची अधिकृत घोषणा मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी आज पत्रकार परिषदेत केली. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर हे तिसरं संमेलन पुण्यात घेण्यात येणार असून केंद्रिय सांस्कृतिक कार्य मंत्री गजेंद्रसिंह शेखावत या संमेलनाचं उद्घाटन करणार आहेत. जागतिक स्तरावर ओळख असलेल्या लेखक आणि अभिनेत्यांचा या संमेलनात सन्मान केला जाईल, या उपक्रमाचा पहिला मान ज्येष्ठ लेखक मधु मंगेश कर्णिक आणि अभिनेता रितेश देशमुख यांना देण्यात येणार आहे, असं सामंत म्हणाले. पुण्यात आयोजित ग्लोबल आंत्रप्रन्योर्स कॉन्क्लेव्ह 2025 च्या उद्घाटन सोहळ्यालाही उदय सामंत उपस्थित होते. राज्याने एनआरआय धोरणात सकारात्मक बदल करत उद्योग व्यवसायाच्या वाढीसाठी याची प्रभावी अमलबजावणी सुरू केली असल्याचं सामंत यावेळी म्हणाले.

**जैवविविधता उद्यान**

राज्यात डोंगर उतार डोंगर माथा आणि जैवविविधता उद्यान याबाबत प्रत्येक ठिकाणचा प्रश्न वेगवेगळा आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विविध ठिकाणच्या परिस्थितीनुसार प्रस्ताव तयार करण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यानुसार पुढील काळात राज्याचे याबाबत एकत्रित धोरण ठरवण्यात येईल अशी माहिती नगर विकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी आज पुण्यात दिली. पुणे महानगरपालिके अंतर्गत विविध विकास कामं, प्रकल्पांचा आढावा त्यांनी घेतला; तसंच आयुक्त राजेंद्र भोसले आणि इतर अधिकाऱ्यांसमवेत बैठक घेतली. त्यानंतर आयोजित पत्रकार परिषदेत त्या बोलत होत्या.

**विनामान्यता शाळा**

पुणे जिल्हयात मान्यता नसलेल्या शाळांची माहिती नसल्याने विद्यार्थी आणि पालकांची फसवणूक होते. हे नुकसान टाळण्यासाठी जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाने जिल्ह्यातील मान्यता नसलेल्या 12 शाळांची यादी केली आहे. मान्यता नसलेल्या शाळा चालवल्यास संबंधित संस्थांना कायदेशीर

कारवाईला समोरं जावं लागेल असा इशारा प्राथमिक शिक्षणाधिकारी संजय नाईकडे यांनी दिला. जिल्हा परिषदेत आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते.  पालकांनी पाल्याचा प्रवेश घेताना शाळेला मान्यता, प्रथम मान्यता, यू डायस, स्वमान्यता आहे की नाही याची खात्री करावी. असंही नाईकडे म्हणाले.

**खासगी रुग्णालयत पासणी**

आरोग्य विभागातर्फे राज्यातील खासगी रुग्णालयांची तपासणी करण्यात येणार आहे. यासाठीची नियमावली आरोग्य विभागाने तयार केली आहे. दरम्यान, आरोग्य विभाग नेमकी कशाची तपासणी करणार हे त्यांनी आधी स्पष्ट करावं, तपासणीची पूर्वसूचना रुग्णालयांना द्यावी आणि रुग्णालय तसंच डॉक्टरांना नाहक त्रास देऊ नये. असं आवाहन हॉस्पिटल बोर्ड ऑफ इंडियाचे राष्ट्रीय सचिव डॉक्टर संजय पाटील यांनी केलं आहे.

**पुणे मनपा थकबाकी**

पुणे महापालिकेच्या मिळकतकराची थकबाकी 10 हजार कोटी रुपयांवर गेली आहे. त्यामुळे मिळकत कर विभागाने थकबाकीदारांकडून वसुलीसाठी  मिळकती सील करून त्यांचा लिलाव करण्याबरोबरच आता मोबाइल टॉवरची थकबाकी वसूल करण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत. यासंदर्भात शासनाशी पत्रव्यवहार करून थकबाकी वसुलीसाठी पाठपुरावा करण्यात येणार असल्याचं उपायुक्त आणि मिळकतकर विभागाचे प्रमुख माधव जगताप यांनी सांगितलं.

**जीएसटी आंदोलन**

आपल्या विविध मागण्यांसाठी, महाराष्ट्र राज्य वस्तू सेवा कर राजपत्रित अधिकारी संघटनेने राज्यभर दररोज दोन तास लेखणी बंद आंदोलन सुरू केलं आहे. या आंदोलनाचा आजचा तिसरा दिवस आहे. मागण्या मान्य झाल्या नाहीत तर 23 जानेवारीपासून बेमुदत आंदोलन करण्याची भूमिका संघटनेने घेतली आहे.

**खो-खो**

नवी दिल्लीमध्ये 13 ते 19 जानेवारी दरम्यान होणाऱ्या पहिल्या खो-खो विश्वचषक स्पर्धेसाठी जाहीर झालेल्या भारतीय पुरूष संघात महाराष्ट्रातील पाच तर महिला संघात तीन खो-खोपटूंची निवड झाली आहे. पुरुष आणि महिला गटाचं कर्णधारपद पुण्यातील खेळाडूंना मिळालं आहे. पुरूष संघाच्या कर्णधारपदी प्रतिक वाईकर आणि महिला संघाच्या कर्णधारपदी प्रियंका इंगळेची नियुक्ती करण्यात आली आहे.

**क्रीडा**

पुणे जिल्हा फुटबॉल संघटनेच्या वतीने 'पीडीएफए लीग 2025' फुटबॉल स्पर्धा सुरू आहेत. यात चुरशीच्या सामन्यामध्ये उत्कर्ष क्रीडा मंचाने लिजंड्स फुटबॉल ॲकॅडमीचा 3-2 असा पराभव केला. अशोका फुटबॉल क्लबने मॅथ्युज् एफसी संघाचा 3-0 असा सहज पराभव केला. सामन्यामध्ये सुरज बी., विशाल जी. आणि हेमंत पी. यांनी प्रत्येकी एकेक गोल करून संघाचा विजय साकार केला.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज 10 पूर्णांक 7 दशांश सेल्सियस किमान तापमान नोंदवलं गेलं. उद्या किमान 12 अंश तर कमाल 29 अंश सेल्सियस तापमान राहण्याचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, संध्याकाळी सहा वाजता, नमस्कार.**